| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलीस<br>PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./३२९८ /२०२४** **दिनांक :- ३०/०४/२०२४**

**प्रसिध्दीपत्रक**

पुणे शहरामधील जुना मुंबई पुणे हायवे वरील वाहतूक ही हायवे व मेट्रोच्या कामामुळे खडकी बाजार मार्गे वळविण्यात आलेली होती नमुद मार्गावर वाहतूक सुरक्षित व सुरळीत राहण्याकरिता नमुद परिसरामधील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर खडकी वाहतुक विभागा अतंर्गत दि. ०१/०५/२०२४ रोजी पासुन पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात वाहतुकीमध्ये बदल करीत आहे.

**१. मुंबई पुणे जुना हायवे वरील चर्च चौक ते बोपोडी चौक दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांसाठी दुहेरी वाहतुक सुरु करण्यात येत आहे.**

**२. बोपोडी चौक ते खडकी बाजार मार्गे होळकर पुलापर्यंत एलफिन्स्टन रोड वरती दुहेरी वाहतुक सुरु करण्यात येत आहे.**

**३. बोपोडी चौक ते होळकर चौक दरम्यान एलफिन्स्टन रोडवरती जड वाहनांना प्रवेश बंद राहील.**

**४. हॅरिष ब्रीज वरुन येवुन खडकी पोलीस ठाणे रेल्वे अंडरपास मार्गे जाणा-या वाहनानी सीएफडी चौकामधुन ऑलसेट स्कुल मार्गे जावे.**

**५. ऑर्डीन्स फॅक्टरी हॉस्पीटल चौक ते सीएफडी चौकामधुन हॅरीष ब्रीज कडे जाण्यासाठी प्रवेश बंद राहिल.**

**६. चर्च चौक ते आयुध चौक दरम्यान जनरल थोरात मार्गोवर दुहेरी वाहतुक सुरु करण्यात येत आहे.**

**(रोहिदास पवार )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**